पुण्य नगरी
वर्धा वृत्तवेध
(१) नागपूर ■ गुरुवार, दि. २९ जानेवारी २००९

# महिलांना मार्गदर्शनाची गरज- आ. काळे



मंचावर उपस्थित आ. काळे, दत्ताजी मेघे व इतर मान्यवर, दुसऱ्या चित्रात मेळाव्याला उपस्थित महिला.

तळेगाव (श्या.पंत), दि. २८ (प्रतिनिधी) - महिला वर्गांमध्ये कार्य करण्याची व प्रगती साधण्याची जिद्द आहे. या महिलांना योग्य त्या मार्गदर्शनाची गरज असल्याचे मत आ. अमर काळे यांनी व्यक्त केले.

महिला बचत गटाचा कृषी मेळावा, प्रदर्शन येथील जायक मंगल कार्यालयात तालुका कृषी अधिकारी व भारतीय खादी उद्योग बहुउद्देशीय शिक्षण संस्था चिस्तुर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आले होते. त्यावेळी काळे बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जि.प.च्या अध्यक्ष कलावती वाकोडकर होत्या.

प्रमुख पाहुणे म्हणून माजी आ. दत्ता मेघे, विभागीय कृषी महासंचालक डॉ. भुतडा, पं.स. सदस्य गोविंद बुले, पं.स. सदस्य नागोराव खोडे, प्रफुल्ल काळे, श्रीमती विशाखा राव, श्रीमती राजश्री आवंडे, नरेंद्र काळे यांची उपस्थिती होती. उद्घाटक म्हणून पुढे बोलताना आ. काळे म्हणाले, कृषी क्षेत्रातील सहली व प्रात्यक्षिकातून महिलांना मार्गदर्शन करणे अत्यावश्यक आहे. महिला वर्गाला कृषीसंबंधी प्रशिक्षण आज देण्याची गरज आहे. जोपर्यंत योग्य प्रशिक्षण दिले जाणार नाही, तोपर्यंत त्यांच्यामधील कुशलता वाढणार नाही. ही कुशलता वाढण्याकरिता सर्वांनी प्रयत्न करण्याची गरज यावेळी त्यांनी व्यक्त केली. दत्ता मेघे म्हणाले, महिलांनी समूहाने उद्योगाकडे वळून कार्यशील बनण्यासाठी प्रयत्न करा. उद्योग करणाऱ्या गटांना १ लाख रुपयांपर्यंतचे कर्ज उपलब्ध होत आहे.

उद्योग उभारणाऱ्या बचत गटाच्या पाठीशी शासन उभे असून शासनाच्या योजनांचा फायदा घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले. यावेळी नवचैतन्य बचत गट, उन्नती महिला बचत गट, जीवन ज्योती महिला बचत गट यांनी केलेल्या उल्लेखनीय कार्याबद्दल बचत गटाचे अध्यक्ष व सचिव यांचा सत्कार करण्यात आला. मेळाव्याला परिसरातील ७५ बचत गटांच्या महिलांचा प्रतिसाद लाभला. मेळाव्याच्या यशस्वितेकरिता कृषी विभाग व संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी परिश्रम घेतले. संचालन प्रभाकर भालेराव यांनी केले, तर आभार बसवंत होले यांनी मानले.

लोकमत HELLO वर्धा शनिवार, दि.१७ जानेवारी २००९ २

# ...तरच हरितक्रांती शक्य - मेघे

तळेगाव (श्यामजी पंत), दि.१६ (वार्ताहर) - माहिती तंत्रज्ञानाच्या युगात महिलांनी सर्वच क्षेत्रात क्रांती घडविली. कृषी क्षेत्रात त्यांनी लक्ष घातल्यास निश्चितच हरितक्रांती झाल्याशिवाय राहणार नाही, असे प्रतिपादन माजी खासदार दत्ता मेघे यांनी केले.

स्थानिक जानक मंगल कार्यालयात आयोजित महिला बचत गटाच्या मेळाव्यात प्रमुख अतिथी म्हणून ते बोलत होते. मेळाव्याचे उद्घाटन आमदार अमर काळे यांच्या हस्ते करण्यात आले. अध्यक्षस्थानी विभागीय कृषी सहसंचालक डॉ.भुतडा तर प्रमुख अतिथी म्हणून जि.प.अध्यक्ष कलावती वाकोडकर, डॉ.प्रफुल्ल काळे, पं.स. सदस्य गोविंद बुले, नागोराव खोंडे, बाजार समितीचे संचालक विनोद खोंपे, उपविभागीय अधिकारी नरेंद्र काळे उपस्थित होते.



बोलताना दत्ता मेघे सोबत आ.काळे, सौ.वाकोडकर व मेळाव्याला उपस्थित बचत गटाच्या महिला.

याप्रसंगी बोलतांना मेघे म्हणाले की, महिला बचत गटाने निरनिराळ्या क्षेत्रासोबत शेतीमध्ये पुढे यावे. त्यासाठी महिलांना शेतीकरीता चार वर्षासाठी एक लाख रुपये बिनव्याजी देण्याचे आश्वासन त्यांनी दिले; मात्र त्यानंतर पाचव्या वर्षी पैसे परत करण्याची व्यवस्था उत्पादनातून करावी, असेही त्यांनी सांगितले. तर महिलांनी कृषी क्षेत्राच्या सर्वांगीण विकासासाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहन आमदार काळे यांनी केले.

यावेळी नवचैतन्य, जीवनज्योत आणि उन्नती महिला बचत गटाचे अध्यक्ष व सचिवांचा शाल, श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक तालुका कृषी अधिकारी राजेंद्र मानकर यांनी केले. संचालन प्रकाश भालेराव तर आभार यशवंत होले यांनी मानले. आयोजनाकरिता दिलीप राठी, माजी सरपंच अरुण गणोरकर, उकंडराव देशमुखे, रामदऱ्याचे सरपंच संजय भुजाडे, चिस्तुरचे सरपंच अनिल पाटील, मोहेकर, घनश्याम मुंदडा, श्याम मिसळे, संजय खोंडे, मनीष धावडे यांच्यासह विविध महिला गटाच्या महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

### महिला सक्षमीकरण

# शासकीय योजनांचा लाभ घेऊन प्रगती करा

## कलावती वाकोडकर : कृषी बचतगट मेळावा; दीड हजार महिलांची उपस्थिती; उत्पादित वस्तुंची प्रदर्शनी

सकाळ वृत्तसेवा

तळेगाव (श्यामजीपंत), ता. २१ : बचतगटातील महिलांना सक्षम करण्याकरिता शासनाच्या विविध योजना असून, या योजनांचा लाभ घेऊन महिलांनी बचतगटासोबतच कुटुंबाचा विकास साधावा, असे आवाहन जिल्हा परिषदेच्या अध्यक्ष कलावती वाकोडकर यांनी केले.

तालुका कृषी अधिकारी व भारतीय खादी ग्रामोद्योग बहुउद्देशीय शिक्षण संस्था, चिस्तूर यांच्या वतीने राष्ट्रीय कृषी धोरणांतर्गत आष्टी तालुक्यातील महिला कृषी बचतगटाचा मेळावा व त्यांनी उत्पादित केलेल्या वस्तूंचे प्रदर्शन जाधव मंगल कार्यालयात लावण्यात आले.

कृषी क्षेत्रात महिलांचा अधिक कार्यक्षम सहभाग वाढविण्यासाठी आयोजित या मेळाव्याच्या अध्यक्षस्थानाहून त्या बोलत होत्या.

मेळाव्याचे उद्घाटन आमदार अमर काळे यांच्या हस्ते करण्यात आले. माजी खासदार दत्ता मेघे, डॉ. जे. सी. भुतडा, विभागीय कृषी सहसंचालक गोविंद बुले, पंचायत समिती सदस्य नागोराव खोडे यांची प्रमुख उपस्थिती होती. मेळाव्यात सहभागी महिलांना प्रफुल्ल काळे, विशाखा राव, राजश्री आष्टे, नरेंद्र काळे यांनी मार्गदर्शन केले.

प्रास्ताविकात तालुका अधिकारी राजेंद्र मानकर व संस्थेचे अध्यक्ष यशवंत होले यांनी मेळाव्याचे उद्देश व बचतगट कार्यांचा आढावा सादर केला.

कृषी क्षेत्रात महिलांचा अधिक सहभाग कसा वाढेल, यावर कृषी विभागाने प्रयत्न करावा. कृषी क्षेत्रातील सहली व प्रात्यक्षिकातून जोपर्यंत मार्गदर्शन होणार नाही किंवा कृषी संबंधित उद्योगाबाबत प्रशिक्षण दिले जाणार नाही, तोपर्यंत महिलांची कार्यकुशलता वाढणार नाही.

> " महिलांनी उद्योगाकडे समूहाने वळून कार्यशील राहण्याची गरज आहे. उद्योग करणाऱ्या गटांना एक लाख रुपयांपर्यंतचे कर्ज शून्य टक्के दराने द्यावे. "
>
> \- माजी खासदार दत्ता मेघे

त्याकरिता आपण सदैव सहकार्य करण्यास तयार असल्याचे आश्वासन आमदार अमर काळे यांनी दिले.

कृषी प्रदर्शनात चिस्तूर येथील नवचैतन्य महिला बचतगटाने 'शेती करातून नफ्याची शेती', उन्नती महिला बचतगटाने गृहउद्योग, तसेच जीवनज्योती महिला बचतगटाने सेंद्रिय भाजीपाला उत्पादनाचा प्रकल्प सादर केला होता. पाचही बचतगटातील महिलांचा मान्यवरांच्या हस्ते शाल व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला.

मेळाव्यात तालुक्यातील ७५ बचतगटांच्या एक हजार ५०० महिलांनी उपस्थिती दर्शविली. आयोजनाकरिता कृषी विभागाचे अधिकारी, कर्मचारी, संस्थेचे पदाधिकाऱ्यांनी सहकार्य केले. संचालन प्रकाश घालेराव यांनी केले, यशवंत होले यांनी आभार मानले. यावेळी मोठ्या संख्येने महिला उपस्थित होत्या.




वर्धा : बचतगटातील महिलांना मार्गदर्शन करताना जिल्हा परिषद अध्यक्ष कलावती वाकोडकर उपस्थित दत्ता मेघे, आमदार अमर काळे आणि मान्यवर.

# जिल्ह्यातील शेतकऱ्यांची राष्ट्रपतींशी भेट

▶ वार्ताहर

पवनार, दि. ४- भारत देशाचे राष्ट्रपती डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम आझाद यांचे विशेष आमंत्रणावरून वर्धा जिल्ह्यातील प्रगतिशील शेतकऱ्यांनी दिल्ली येथे त्यांची भेट घेतली. राष्ट्रीय फलोत्पादन अभियान २००६ -०७ अंतर्गत जिल्ह्यातील शेतकऱ्यांचा अभ्यास दौरा आयोजित करण्यात आला.

दौऱ्याअंतर्गत मोगल उद्यानास भेट देऊन उद्यानातील औषधी, सुगंधी वनस्पती, फुलांच्या विविध जातींची पाहणी करून राष्ट्रपतींची भेट घेतली. त्यांनी शेतकऱ्यांना जीवनात यशस्वी होण्यासाठी आठ सूत्रे सांगितली. ती म्हणजे बालके देशाची संपत्ती आहे. मुला-मुलींनी समान वागणूक देऊन स्त्रीभ्रूण हत्या न होऊ देणे, व्यसनाधीन होऊ नका, मर्यादित कुटुंब, मुलांना शिक्षणाचे महत्त्व पटवून देणे, वन व प्रदूषणाची रक्षा करणे, वृक्षारोपण व संवर्धन करणे, मुलांना आदर्श व्यक्ती बनविण्याची जबाबदारी पालकांची.

राष्ट्रपतींमध्ये शिक्षण, पर्यावरण व विशेषत: मुलांबाबतचा कळवळा



अभ्यास दौऱ्यात सहभागी झालेले वर्धा जिल्ह्यातील ५० स्त्री-पुरुष शेतकरी

दिसून आला. या अभ्यास दौऱ्यात शेतकऱ्यांनी पुसा येथील भारतीय कृषी अनुसंधान संस्थानाला भेट देऊन गहू, तूर, मूग, उडीद व भाजीपाला यांच्या विकसित वाणाबाबत माहिती घेतली. कीटकशास्त्रज्ञ डॉ.हरिशकुमार यांनी एकात्मिक कीड व्यवस्थापना बाबत तर पुसा केंद्राचा इतिहास व निर्मितीबाबत कृषी विस्तार विभागाचे डॉ. विनोदकुमार यांनी माहिती दिली.

इस्राईल धरतीवर आधारित प्रकल्प, सूक्ष्म सिंचन व हरित गृहातील भाजीपाला पिके व फुलशेतीबाबत कृषी अभियांत्रिकीचे डॉ. बलराजसिंग यांनी माहिती दिली. अभ्यास दौऱ्यादरम्यान भारतीय गन्ना अनुसंधान केंद्र लखनौ येथे विविध औषधी,सुगंधी वनस्पती, त्याचे उपयोग व संस्थेने विकसित केलेल्या जातीबाबत डॉ.आर.पी. यादव यांचेकडून,विविध क्षमतेचे गाळप यंत्र (डिस्टीलेशन प्लँन्ट) बाबत माहिती डॉ. जमील अहमद यांनी दिली. डॉ. महंमद यांनी डिस्टीलेशन झाल्यानंतर टाकाऊ पदार्थांपासून गांडूळखत तयार करण्याची प्रक्रिया प्रात्यक्षिकासह समजावून दिली.

शेतकऱ्यांची निवासाची व्यवस्था खा. सुरेश वाघमारे यांचे दिल्ली येथील निवासस्थानी केली. डॉ. कलाम यांना वर्ध्याचे जिल्हाधिकारी खोब्रागडे यांनी तयार केलेल्या 'तुच माझा सरकार'या लघुपटाची चित्रफीत डॉ.नंदकिशोर तोटे यांनी भेट दिली. दौऱ्यासाठी ५० शेतकऱ्यांची निवड केली होती.

सकाळ : नागपूर
शुक्रवार, १६ जुलै २०१०

# कृषी उत्पादन वाढीबरोबरच प्रक्रिया उद्योगही आवश्यक

## माटिया गलेटी : समन्वयित कृषी विकास प्रकल्प कार्यशाळेचे उद्घाटन

सकाळ वृत्तसेवा

अमरावती, ता. १५ : देशाच्या अन्नसुरक्षेसाठी शेतीवर अधिक लक्ष केंद्रित करणे गरजेचे असून, समन्वयित कृषी विकास प्रकल्पाच्या माध्यमातून कृषी उत्पादन वाढीबरोबरच कृषी माल प्रक्रिया व विपणन व्यवस्थेवर अधिक भर देण्याची आवश्यकता आहे, असे प्रतिपादन इटलीच्या रोम येथील कंट्री प्रोग्राम मॅनेजर माटिया गलेटी यांनी केले.

विदर्भातील आत्महत्याग्रस्त सहा जिल्ह्यांसाठी महाराष्ट्र शासन व आंतरराष्ट्रीय कृषी विकास निधी तसेच सर रतन टाटा ट्रस्ट यांच्या वतीने राबविण्यात येत असलेल्या 'कॅम' प्रकल्पाअंतर्गत डॉ. पंजाबराव देशमुख प्रबोधिनी येथे सुरू झालेल्या दोन दिवसीय कार्यशाळेचे उद्घाटन माटिया प्रेयर गलेटी यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी मार्गदर्शक म्हणून ते बोलत होते.




अमरावती : कार्यशाळेत मार्गदर्शन करताना माटिया गलेटी. सोबत विन्सेंट डार्लिंग, एन. नवीन सोना, अमितांशु चौधरी आदी.

यावेळी विन्सेंट डार्लिंग, अतिरिक्त आयुक्त एन. नवीन सोना, सर रतन टाटा ट्रस्टचे अमितांशु चौधरी, सुधा कोठारी, सहप्रकल्प संचालक सुदाम पवार तसेच विभागातील सर्व जिल्हाधिकारी, स्वयंसेवी संस्थांचे प्रमुख व नाबार्डचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. प्रकल्पाविषयी माहिती सांगताना माटिया गलेटी म्हणाले, "समन्वयित कृषी विकास प्रकल्प यशस्वी होण्यासाठी सहभागिता, स्थायित्व, बांधिलकी, भागीदारी, समन्वय, लवचिकता व लक्ष्य निश्चित करणे अत्यंत महत्त्वाचे आहे. ग्रामीण भागातील अल्पभूधारक शेतकरी व महिलांसाठी या प्रकल्पाची अंमलबजावणी करताना त्यांच्यामध्ये विश्वासाचे नाते निर्माण करण्याची आवश्यकता व्यक्त करण्याची आवश्यकता आहे," असे गलेटी यांनी सांगितले. कृषी विकास प्रकल्पाविषयी माहिती देताना प्रकल्प संचालक नवीन सोना यांनी विदर्भातील अमरावती, अकोला, यवतमाळ, वाशीम, बुलडाणा व वर्धा या सहा जिल्ह्यांमध्ये आत्महत्या होत असताना तेथे सिंचनाच्या सुविधा तसेच शेतीला जोडधंदा निर्माण करून शेती उत्पादन वाढीला प्रोत्साहन देण्यासाठी विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. या कार्यशाळेला सहा जिल्ह्यातील जिल्हाधिकारी, संबंधित वरिष्ठ अधिकारी उपस्थित आहेत.

लोकमत HELLO वर्धा

५ डिसेंबर २००७

# आर्वीत सेंद्रिय शेती अभियान व कार्यशाळा

आर्वी, दि.५ (प्रतिनिधी)- भारतीय बहुउद्देशीय खादी ग्रामोद्योग संस्थेच्यावतीने सेंद्रिय शेती अभियान, कमी खर्च उत्पादन जास्त, विषमुक्त शेती, ग्रामीण उद्योग, गांडूळ जीवामृत प्रकल्प, ग्रामीण रोजगार निर्मिती शेतीवर आधारित व्यावसायिक प्रशिक्षण आदी विषयावर तज्ज्ञ मार्गदर्शकांनी कार्यशाळेत मार्गदर्शन केले.

तळेगाव (शा) येथील अमरजित मंगल कार्यालयात आयोजित कार्यशाळेत आर्वी,आष्टी,कारंजा येथील महिला बचत गट, पुरुष शेतकरी बचत गट, कृषीविज्ञान मंडळातील असंख्य कार्यकर्त्यांनी व सामाजिक कार्यकर्ते सुनील पारसे होते. कार्यशाळेत विविध विषयावर तज्ञांनी मार्गदर्शन केले.

संचालन सुहास ठाकरे यांनी केले तर आभार यशवंत होले यांनी मानले. आयोजनास प्रकाश भालेराव, चंद्रशेखर बाबरे, सचिन होले आदींनी सहकार्य केले.



बोलताना यशवंत होले, उपस्थित मान्यवर अतिथी व बचत गटाच्या महिला.

## तळेगावात सेंद्रिय शेतीवर कार्यशाळा

आर्वी, ता. २ : चिस्तूर येथील भारतीय बहुउद्देशीय खादी ग्रामोद्योग संस्थेच्या वतीने तळेगाव (श्यामजीपंत) येथील अमरजित मंगल कार्यालयात सेंद्रिय शेतीसह विविध विषयांवर कार्यशाळा घेण्यात आली. कार्यशाळेत सेंद्रिय शेती अभियान, कमी खर्च उत्पादन जास्त, विषमुक्त शेती, ग्रामोद्योग, गांडूळ जिवामृत प्रकल्प, ग्रामीण रोजगारनिर्मिती, शेतीवर आधारित व्यावसायिक प्रशिक्षण आदी विषयांवर तज्ज्ञांनी मार्गदर्शन केले. प्रास्ताविक संस्थेचे अध्यक्ष यशवंत होले यांनी केले. आयोजनाकरिता सुनील पारसे, चंद्रशेखर बाबरे, प्रकाश भालेराव, सचिन होले आदींनी सहकार्य केले. कार्यशाळेत आर्वी, आष्टी, कारंजा येथील महिला बचतगट, पुरुष शेतकरी बचतगट, कृषी विज्ञान मंडळ, शेतकरी उपस्थित होते.

लोकमत

२ जानेवारी २००८

लोकमत HELLO

बुधवार, दि. ९ एप्रिल २००८

# चिस्तुरात शेतकरी प्रशिक्षण कार्यशाळा

आर्वी, दि.८ (प्रतिनिधी)- जवळच्या चिस्तुर ग्राम येथील भारतीय बहुउद्देशीय खादी ग्रामोद्योग शिक्षण संस्थेच्या वतीने सेंद्रिय शेती व तंत्रज्ञान या विषयावर शेतकरी प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी गावातील प्रगतशील शेतकरी प्रकाश भालेराव तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून आष्टीचे तालुका कृषि अधिकारी बोरकर होते. याप्रसंगी मार्गदर्शन करताना बोरकर व खोगाडे यांनी कार्यशाळेला उपस्थित शेतकऱ्यांना सेंद्रिय शेती संदर्भात, प्रामुख्याने सेंद्रिय शेतीची आवश्यकता का? व सेंद्रिय शेतीचे महत्व याबाबत सांगून नैसर्गिक साधनांचा शेतीसाठी उपयोग करून गांडूळ खत निर्मिती, वनस्पतीजन्य पाल्यापासून किटकनाशक तयार करण्याच्या पद्धती, कंपोस्ट खत किंवा शिवामृताचा वापर तसेच दशपर्णी अर्क इत्यादी विषयावर शेतकऱ्यांना सखोल मार्गदर्शन केले.

तसेच कमी खर्चाची शेती, विषमुक्त शेती बाजारपेठेत असलेली सेंद्रिय मालाची मागणी, त्याकरिता सेंद्रिय उत्पादन काढण्यास शेतकऱ्यांनी करावयाच्या उपाययोजना व शेतीवर आधारित पूरक उद्योग इत्यादी विषयावर प्रकाश भालेराव व यशवंत होले यांनी शेतकऱ्यांशी चर्चा करून मार्गदर्शन केले व कार्यशाळेचे महत्व पटवून दिले.

कार्यक्रमाचे संचालन अमित पाटील यांनी तर आभार प्रवीण महाणे यांनी व्यक्त केले. यशस्वीतेसाठी अरुण गणोरकर, विजय महाणे, उत्तम भिसळे, विजय काळे यांनी सहकार्य केले. या कार्यशाळेला शेतकरी, शेतमजूर उपस्थित होते.



*सेंद्रीय शेती मार्गदर्शन कार्यशाळेत अनुभव कथन करताना वक्ता व मंचावर उपस्थित मान्यवर पाहुणे.*

लोकमत
शुक्रवार,
दि. २७ मे २०११

## नाबार्डचा उपक्रम, शेतकऱ्यांचा प्रतिसाद

# शेतकरी मंडळाचे उद्घाटन



शेतकरी मंडळाच्या उद्घाटनप्रसंगी उपस्थित मान्यवर आणि शेतकरी.

वर्धा | दि. २६ (जिल्हा प्रतिनिधी)

राष्ट्रीय कृषी व ग्रामीण विकास बँक नाबार्ड पुरस्कृत आणि भारतीय बहुखादी व ग्रामोद्योग शिक्षण संस्था चिस्तुर यांच्या संयुक्त विद्यमाने जयकिसान शेतकरी मंडळ घोरन, समृद्धी किसान मंडळ पाचेगाव, संजीवनी किसान मंडळ वाठोडा या शेतकरी मंडळांचा उद्घाटन सोहळा नुकताच पार पडला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राष्ट्रीय कृषी आणि ग्रामीण विकास बँक नाबार्ड सहप्रबंधक सोरटे तर प्रमुख अतिथी म्हणून बँक ऑफ इंडियाच्या अभायाचे देवपुजारी उपस्थित होते. याप्रसंगी सेंद्रिय शेतीतज्ज्ञ सामाजिक कार्यकर्ते दामुअण्णा उघडे, प्रकाश मालेराव, अनिल पाटील, सरपंच कामिनी जाधव, किसान मंडळाचे सुधाकर साठे, खुशाल आसोले, राहुल तेलतुंबडे, प्रवीण सातपुडके, निलेश पाचोडे, सचिन गहलिंग उपस्थित होते.

संस्थेचे अध्यक्ष यशवंत होले यांनी प्रास्ताविकातून नाबार्डच्या शेतकरी कार्यक्रमाबद्दल तसेच शेतकरी मंडळांचे नाबार्ड अंतर्गत कार्यक्रम याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. नाबार्डचे सोरटे यांनी पाचसूत्री कार्यक्रमाबद्दल शेतकऱ्यांना माहिती देताना शेतकऱ्यांच्या विकासाकरिता शेततळे, डेअरी फार्म, गोट फार्म, गांडूळ निर्मिती, ग्रामीण गोदाम, शेतकरी मंडळाच्या योजना, अशा विविध योजनांचा लाभ घेऊन शेतीची आणि गावाची प्रगती साध्य करावी, अशी माहिती दिली. सेंद्रिय शेती प्रचारक व सामाजिक चळवळीचे दामुअण्णा उघडे यांनी सेंद्रिय शेतीचे महत्त्व, पाण्याचे नियोजन, पिकाचे नियोजन, कृषी उत्पादनावर प्रक्रिया, उद्योग याबाबत माहिती दिली. संचालन पखाले यांनी केले तर आभार राहुल तेलतुंबडे यांनी मानले. यशस्वीतेसाठी मंडळाच्या सदस्य, शेतकऱ्यांनी सहकार्य केले. समारोप राष्ट्रगीताने झाला.

देशोन्नती
शुक्रवार,
दि. २७मे २०११

## चिस्तूर येथे बळीराजा किसान मंडळाची स्थापना

प्रतिनिधी/२६ मे

वर्धा : राष्ट्रीय कृषी आणि विकास बँक नाबार्ड भारतीय बहुउद्देशीय खादी व ग्रामोद्योग शिक्षण संस्थेच्या वतीने चिस्तुर येथे बळीराजा किसान मंडळाचे उद्घाटन करण्यात आले. अध्यक्षस्थानी नाबार्डचे प्रबंधक सोरटे होते. मुख्य मार्गदर्शक म्हणून बँक ऑफ इंडिया, जिल्हा अग्रणी बँकेचे व्यवस्थापक देवपुजारीजी, सेंद्रिय शेतीतज्ज्ञ राजाभाऊ देशमुख, प्रगतशील शेतकरी सिताराम शेळके, भारतीय खादी ग्रामोद्योग संस्थेचे अध्यक्ष यशवंत होले, अरुण मानोरकर, यशवंत होले आदी उपस्थित होते. याप्रसंगी सोरटे यांनी शेतकऱ्यांना नाबार्ड राष्ट्रीय कृषी विकास बँकेबद्दल माहिती दिली. शेतकऱ्यांच्या विकासाकरिता शेततळे, डेअरी फार्म, गोट फार्म, गांडूळ निर्मिती अशा विविध योजनांचा लाभ घेऊन प्रगती साध्य करावी अशी माहिती दिली.

लोकशाही वार्ता गुड मॉर्निंग वर्धा

शनिवार, २८ मे २०११



# नाबार्डतर्फे शेतकरी मंडळाचे उद्घाटन

लोकशाही वार्ता/ २७ मे

वर्धा: राष्ट्रीय कृषी व ग्रामीण विकास बँक नाबार्ड पुरस्कृत आणि भारतीय बहु खादी व ग्रामोद्योग शिक्षण संस्था घिसुर यांच्या संयुक्त विद्यमाने नवकिसान शेतकरी मंडळ, चोपडा समृध्दी किसान मंडळ पाचेगाव संबोधी किसान मंडळ, वाढोडा या शेतकरी मंडळाच्या उद्घाटन सोहळा नुकताच पार पडला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राष्ट्रीय कृषी अणि ग्रामीण विकास बँक नाबार्ड सहप्रबंधक सोरटे होते. प्रमुख अतिथी अभय कौन्सील बँक ऑफ इंडियाचे देवपुजारी, सेंद्रिय शेतीतज्ज्ञ सामाजिक कार्यकर्ते दामू अण्णा उघडे, प्रकाश भालेराव , अनिल पाटील, गावाचे सरपंच महिला कार्यकर्त्या कामिनी जाधव, किसान मंडळाचे सुधाकर साठे, खुशाल आसोले , राहुल तेलतुंबडे, प्रवीण सातपुडके, निलेश पाचोडे, सचिन गडलिंग उपस्थित होते संस्थेचे अध्यक्ष यशवंत होले यांनी प्रास्ताविकातून नाबार्डच्या शेतकरी कार्यक्रमाबद्दल तसेच शेतकरी मंडळाच्या नाबार्डअंतर्गत कार्यक्रम याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. नाबार्डचे सोरटे साहेब यांनी पाचसुत्री कार्यक्रमाबदल शेतकऱ्यांना माहिती देताना शेतकऱ्यांच्या विकासाकरिता शेततळे डेअरी फार्म, शेट फार्म, मांडूळ निर्मिती , ग्रामीण गोडाऊन, शेतकरी मंडळाच्या विविध योजना अशा विविध योजनांचा लाभ घेऊन शेतीची आणि गावाची प्रगती साध्य करावी, अशी माहिती दिली. सेंद्रीय शेती प्रचारक व सामाजिक चळवळीचे दामू अण्णा उघडे यांनी सेंद्रीय शेतीचे महत्त्व, पाण्याचे नियोजन व्यापारी दृष्टीकोनातुन सेंद्रीय शेती आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर सामूहिक शेती पिकाचे नियोजन कृषी उत्पादनावर प्रक्रिया अशी अनेक प्रकारची माहिती दिली. कार्यक्रमाचे संचालन संस्थेचे कार्यकर्ते ईश्वरभाऊ पखाले यांनी केले तर आभार राहुल तेलतुंबडे यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेकरिता मंडळाच्या सर्व सदस्यांनी व शेतकऱ्यांनी सहकार्य केले. कार्यक्रमाचा समारोप राष्ट्रगीताने करण्यात आला.

+++

**कृषी विभागाचा उपक्रम**

लोकमत, नागपूर
३ फेब्रुवारी २०१२

# पथनाट्याद्वारे शेतकऱ्यांपर्यंत योजनांची माहिती

**नरखेड** | दि.२ (तालुका प्रतिनिधी)

**एकात्मिक** पाणलोट व्यवस्थापन कार्यक्रमांतर्गत नरखेड तालुक्यातील एकुण ६२ गावांची निवड झाली असून सदर कार्यक्रमाअंतर्गत प्रचार प्रसिद्धीमध्ये पथनाट्याचे कार्यक्रम एकूण ४० गावांमध्ये भारतीय बहुउद्देशीय खादी व ग्रामोद्योग शिक्षण संस्था चिस्तुर व आष्टी यांचेमार्फत आयोजित करण्यात आले आहे. त्याद्वारे जनजागृती करण्यात येत आहे. यामध्ये कृषी विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध योजना शेतकऱ्यांपर्यंत पोहचविण्यात आल्या.

एकात्मिक पाणलोट व्यवस्थापन कार्यक्रमाअंतर्गत सविस्तर प्रकल्प अहवालाचे काम सुरू असून सदर प्रकल्पास मंजुरी मिळताच सदर गावातील शेतकऱ्यांना या योजनेचा वैयक्तिक व सामूहिक उपचार पद्धतीचा निश्चित फायदा होईल. पथनाट्याद्वारे जनजागृती कार्यक्रमाचा समारोप झाला असून या कार्यक्रमास मोठ्या संख्येने शेतकऱ्यांनी प्रतिसाद दिला. या कार्यक्रमास तालुक्याचे तालुका कृषी अधिकारी रत्नाकर येवले, मंडळ कृषी अधिकारी बी.डी. वानखेडे, कृषी पर्यवेक्षक व्ही. बी. पाटोळे, जि.के. पाटील, कृषी सहायक एन.ए. जिंदे, निलेश बोंदरे, एस. आर.थोटे तसेच पाणलोट जागृती पथकातील कलावंतांनी अथक प्रयत्न करून कार्यक्रम यशस्वी केला. या कार्यक्रमास एकात्मिक पाणलोट व्यवस्थापन कार्यक्रम अध्यक्ष, सचिव व इतर सभासद, ग्रामपंचायतचे सरपंच, सदस्य व इतर पदाधिकाऱ्यांनी तसेच शेतकरीवर्गांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमास प्रतिसाद दिला.



पथनाट्याद्वारे शेतकऱ्यांना विविध योजनांची माहिती देताना कलावंत.